# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 10/04/2023 (सोमवार) सकाळ


---

### बकरी चोरी

**पो.स्टे. जलालखेडा** :– अंतर्गत १० कि.मी. अंतरावरील मौजा भिश्नुर शिवार येथे दिनांक ०८/०४/२०२३ चे २०.०० वा. ते दिनांक ०९/०४/२०२३ चे ०७.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– नानाजी महादेवराव आगरकर, वय ७४ वर्ष, रा. भिश्नुर ता. नरखेड हा जेवन करण्याकरीता गेला होता व रात्री घरीच झोपला असता कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीच्या शेतातील गोठयात बांधलेंल्या १० मोठया बकऱ्या ७ बकरीचे बोकुळ व ३ लहान बकरीचे पीले असे एकुण २० बकऱ्या त्यांची अंदाजे एकुण किंमती १३४०००/– रू. कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि जोशि मो. क्र. ७४९९७ ६०७२८ हे करीत आहे.

### मोटारपंप चोरी

**पो.स्टे. कोंढाळी** :– अंतर्गत ०५ कि.मी. अंतरावरील मौजा नांदोरा येथे दिनांक ०४/०४/२०२३ चे १७.३० ते दिनांक ०५/०४/२०२३ चे १८.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– शेख अस्फाक शेख हबीब, वय ५१ वर्ष, रा. उमाटें नगर कोंढाळी ता. काटोल जि. नागपुर याने बोरवेलला पाणी कमी असल्याने ५ एच पी ची मोटारपंप काढुन ३ एच पी ची मोटारपंप आपले शेतातील बोरवेलमध्ये टाकली व बोरवेलची ५ एच पी ची मोटारपंप काढुन शेतातच संत्राचे झाडाखाली ठेवली होती नमुद घटना वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीची शेतात ठेवलेली ५ एच पी टेक्समोल कंपनीची मोटारपंप अंदाजे किंमती ५२०००/– रू. ची काणीतरी अज्ञात चोराने चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास एएस आय भोजराज तांदुळकर ब. नं ५०६ पोस्टे कोंढाळी मो. नं. ९९२२३१४४४२ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर